S. P.
Addl
Dy. S
O. S
H. C.
RK
Date 17 MAY 2016
Inward No. 7986
18-5-16

जा.क्र.महिला सेल/कच्छ गुजरात/१२१/२०१६
कार्या.पोलीसस अधिक्षक,लोहमार्ग नागपुर
दिनांकः— १८/०५/२०१६

प्रति,

मा. पोलीस अधिक्षक,
लोहमार्ग नागपुर.

**विषयः**— डी.जी.पी. आयजीपी कॉन्फरन्स कच्छ गुजरात—२०१५

**संदर्भः**— आपले कार्या. पत्र क्र.आर/२३/कच्छ गुजरात/२०१६—४९१६ कार्यालय पोलीस अधिक्षक लोहमार्ग, नागपुर अन्वये.

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये आपले कार्यालयीन पत्र प्राप्त झाले,असुन महिला सेल लोहमार्ग नागपुर येथे चालु वर्षी एप्रिल २०१६ पावेतो घेण्यात आलेले शिबीराची माहिती खालील प्रमाणे सादर आहे.

१. सर्विकल कॅन्सर शिबीर दि. २१/०१/२०१६ रोजी रेल्वे पोलीस मुख्या. करमणुक केंद्र अजनी,नागपुर येथे घेण्यात आले. या शिबीरामध्ये तज्ञ डॉ. विनय,डॉ. तरुणा अरोरा तसेच कार्यक्रमात उपस्थिती मा. श्रीमती रोकडे मॅडम व श्रीमती अल्का कुमार व ए.पी.आय तोटेवार मॅडम उपस्थित होते. श्रीमती डॉ. अल्का कुमार सर्विकल कॅन्सर बद्दल चर्चा करुन मार्गदर्शन केले. सदर शिबीरात १० अधिकारी व ४० ते ४५ कर्मचारी हजर होते.

२. महिला व बाल विकास जिल्हा बाल संरक्षण बाबत शिबीर दि. २२/०२/२०१६ रोजी रेल्वे मुख्यालय करमणुक केंद्र अजनी, नागपुर येथे घेण्यात आले. शिबिरात मार्गदर्शन करणारे तज्ञ

१) श्री.कुणाल जाधव बाल व विधीसेवा २) श्री मुश्ताक पठाण— बाल न्याय मंडळ बालकल्याण समिती व बाल संरक्षण कक्ष ३) श्री सी.एम.बोन्डे — जिल्हा परिविक्षा अधिकारी ४) श्रीमती तरुणा अरोरा मेडिकल ऑफिसर या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. राजीव जैन (भा.पो.से.) — मा. पोलीस अधिक्षक लोहमार्ग, नागपुर सहा.पो.निरिक्षक व्ही.एम. तोटेवार— महिला सेल लोह. नागपुर मार्गदर्शन करणारे तज्ञ उपस्थित होते.

सदर शिबीरात २५ ते ३० अधिकारी व ७० ते ८० पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

सदर शिबीरात २५ ते ३० अधिकारी व ७० ते ८० पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

३. सेव्ह द चिल्ड्रेन इंडिया (शिबीर) कार्यशाळा दि. २७/०४/२०१६ रोजी रेल्वे मुख्या. करमणुक केंद्र लोहमार्ग अजनी, नागपुर येथे घेण्यात आले. शिबीरात मार्गदर्शन करणारे तज्ञः– १) अनिरुध्द पाटिल – महिला व बाल वाहतुक प्रतिबंधक यांनी मार्गदर्शन केले तसेच २) श्री प्रविण कदम ३) कल्याणी कापसे यांनी अनैतिक मानवी वाहतुक याबाबत कायदा व उपाय योजना बाबत चर्चा करुन माहिती दिली. तसेच महिला मुली व मुले याबात शारिरिक शोषण कसे व कुठल्या कारणाने होतात याबद्दल व बांग्लादेशी महिलाचे वाहतुक कश्या पध्दतीने करतात या बद्दल मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद श्री. राजीव जैन (भा.पो.से.) मा. पोलीस अधिक्षक,लोहमार्ग नागपुर व श्री. उत्तम खैरमोडे मा. अपर पोलीस अधिक्षक लोहमार्ग,नागपुर यांचा मार्गदर्शनाखाली कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमामध्ये श्रीमती वैशाली तोटेवार मॅडम संयोजिका होत्या. सदर कार्यशाळेत १० ते १५ अधिकारी व ३० ते ४० पोलीस कर्मचारी हजर होते.

करिता माहितीस्तव सविनय सादर.

प्रभारी अधिकारी
महिला सेल,लोहमार्ग नागपुर